# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.05.2026** **वारः गुरूवार**

---

1. स्वच्छ भारत अभियान आणखी प्रभावीपणे राबावण्याची गरज- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
2. SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाच शिक्कामोर्तब
3. समान नागरी कायदा स्वीकारणारं आसाम ठरल, ईशान्य भारतातील पहिलं आणि देशातील तिसरं राज्य आणि
4. आठव्या भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये पुरुषांच्या भालाफेकीत हरियाणाच्या सुमित अंतिलनं मिळवल सुवर्णपदक

**<u>पंतप्रधान</u>**

स्वच्छ भारत अभियान 2 आणखी प्रभावीपणे राबावण्याची गरज असून केवळ हे अभियान केवळ पायाभूत सुविधा विकासा पुरते मर्यादित न राहता नियमित समीक्षा, लोकसहभाग आणि विविध संस्था संघटनांच्या समन्वयाने कायमस्वरूपी यशस्वी करण आवश्यक आहे, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. नवी दिल्लीत काल पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली 51 वी प्रगती बैठक झाली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पंतप्रधांन मोदी यांनी नविकरणीय ऊर्जा निर्मिती, नदी सुधार प्रकल्प, रस्ते आणि बंदरांचा विकास, सागरी किनाऱ्यांचा विकास आदि सरकारतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध विकास योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतला. स्वच्छता अभियान अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी सर्व राज्य सरकारांनी कचऱ्यावरील पुनरप्रक्रिया प्रकल्प आणि गोबर गॅसप्रकल्प अधिक वेगाने राबवावेत अशा सूचना पंतप्रधानांनी केल्या. तसच शहरातील राहवासी इमारती, सरकारी कार्यालये आणि सार्वजनिक संस्थांच्या इमारतींच्या छतावर सोलर पॅनल बसवून सौर ऊर्जा निर्मिती वाढवावी, ग्रामीणभागात नदीकाठच्या मोकळ्या जागांवरही सौर ऊर्जा संयंत्र बसवून स्वच्छ ऊर्जा निर्मितीला चालना द्यावी असा सल्लाही मोदी यांनी यावेळी दिला

**<u>पीडीएस</u>**

सार्वजनिक शिधावाटपासाठी राज्यांना निधी देणारी सार्थक पीडीएस योजना 16व्या वित्त आयोगाच्या कालावधीत पुढे राबवण्याला, केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळ बैठकीनंतर वार्ताहरांना ही माहिती दिली. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी 25 हजार 530 कोटी रुपयांची तरतूद करण्याचा प्रस्तावही या बैठकीत मंजूर झाला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्यानं, सार्थक पीडीएस मधे 3 प्रणाली विकसित केल्या आहेत. लाभार्थ्यांची नोंदणी सांभाळण्यासाठी 'निर्मल', तर तक्रारींवर दाद मागण्यासाठी 'आशा' ही बहुभाषक प्रणाली तयार केली आहे. वितरण व्यवस्थेतल्या मालाची वाहतूक करणारे ट्रक किंवा इतर वाहनांची हालचाल, 'सक्षम' या प्रणालीत टिपली जाते. या योजनेअंतर्गत राज्यसरकारांना निधी देताना लागू होणाऱ्या नियमातही सुधारणा केली आहे, असं वैष्णव म्हणाले.

**<u>SIR</u>**

SIR अर्थात मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयानं काल शिक्कामोर्तब केलं. जन प्रतिनिधीत्व कायदा 1950 च्या कलम 324 नुसार निवडणूक आयोगाला पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्याचा अधिकार आहे, असं न्यायालयानं सांगितलं. इतर पुनरीक्षणापेक्षा SIR ची प्रक्रिया वेगळी आहे एवढ्याच

कारणामुळं ते अवैध ठरत नाही असं सांगून SIR मुळे नागरिकत्व रद्द होतं हा याचिकाकर्त्यांचा दावा न्यायालयानं फेटाळून लावला.

**युसीसी**

आसाम विधानसभेनं 'समान नागरी संहिता विधेयक' काल मंजूर केल्यामुळं अशा प्रकारचा कायदा स्वीकारणारं आसाम हे ईशान्य भारतातील पहिलं आणि देशातील तिसरं राज्य ठरलं आहे. विवाह, घटस्फोट, वारसा हक्क आणि 'लिव्ह-इन' संबंधांशी निगडीत बाबींमध्ये, राज्यातील सर्व रहिवाशांसाठी एकच नागरी कायदेशीर चौकट प्रस्थापित करणं हा या कायद्याचा उद्देश आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सिक्कीम दौऱ्यावर असून, गंगटोक इथल्या पालजोर क्रीडा संकुलात आयोजित विशेष कार्यक्रमात, सिक्कीम पोलिस विभागाला त्यांच्या हस्ते प्रतिष्ठेचा राष्ट्रपती पोलिस ध्वज प्रदान करण्यात येणार आहे. हा विशेष पुरस्कार मिळवणार सिक्कीम हे देशातील 15 आणि राज्य तर पूर्वोत्तर राज्यांमधील तिसर राज्य ठरल आहे. राष्ट्रपती पोलिस ध्वज हा देशातील पोलिस विभागाला मिळणारा सर्वोच्च सन्मान मानला जातो. असामान्य सेवा, शिस्त आणि राष्ट्राप्रती समर्पण भावना या गुणांच्या जोरावर हा सन्मान प्रदान करण्यात येतो. गंगटोक इथ होणाऱ्या या सोहळ्यात सिक्कीम पोलिसांचे 4 शे कर्मचारी संचलनात सहभागी होऊन राष्ट्रपतींना मानवंदना देणार आहेत.

**चौहान**

केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान आज नवी दिल्लीत खरीप अभियान 2026 या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच उद्घाटन करणार आहेत. दोन दिवस होणाऱ्या या परिषदेत कृषि आणि संबंधित विषयावर व्यापक चर्चा होणार असून, राज्यांमधील भागीदारी आणि हवामान बदलाच्या आव्हानाच्या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामासाठी धोरणात्मक कृती आराखडा तयार करण हा या परिषदेमागचा उद्देश आहे. या परिषदेत कृषि उत्पादन वाढवणे, लहरी हवामान आणि बदलत्या पावसाच्या पॅटर्न नुसार पीक लागवड, सेंद्रिय शेती, कृषि क्षेत्रासाठी विविध डिजिटल उपकरणे आणि ए आयचा वापर, पिकांचे दुबार आणि तिबार उत्पादन आदि विषयांवर चर्चा होणार आहे.

**ऊस-कांदा**

साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणं, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचं ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. नवी दिल्लीत महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली. साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणं गरजेचं असल्याचं शाह यांनी मान्य केलं आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचं आश्वासन देण्यात आले आहे. व्याज सवलतीचे पैसे तात्काळ देण्याचं मान्य करण्यात आलं आहे. नाफेड आणि एनसीसीएफनं सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. सध्या कांद्याचं बियाणं मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्यानं देशांतर्गत कांद्याला निर्यात बाजारपेठ उरत नाही म्हणून कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात ‘निर्यात अधिभार’ लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर कोणतीही बंदी नाही, असं या चर्चेत स्पष्ट करण्यात आलं.

**शुभेच्छा**

देशभरात आज साजऱ्या होत असलेल्या ईद अल-अधा-अर्थात बकरी ईदनिमित्त राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईद-अल-अधा हा सण भक्ति, त्याग आणि निस्वार्थतेच प्रतीक असून तो सर्वांना मानवतेची सेवा करण्याची प्रेरणा देतो. या निमित्ताने नागरिकांनी समाजात प्रेम आणि बंधुभाव वाढवण्यासाठी दृढ संकल्प करावा अस राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हंटल आहे.

**पॅरा ॲथलेटिक्स**

आठव्या भारतीय खुल्या आंतरराष्ट्रीय पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये बंगळुरु इथं, हरियाणाच्या सुमित अंतिलनं पुरुषांच्या भालाफेकीत स्वतःचाच जागतिक विक्रम मोडीत काढताना 74 मीटरपेक्षा जास्त अंतरावर भाला फेकला आणि सुवर्णपदक मिळवलं. महाराष्ट्राच्या संदीप सरगरनं 62 पूर्णांक 88 मीटर भालाफेक करून रौप्यपदक मिळवलं. महाराष्ट्राच्या दिलीप गावीत यानं पुरुषांच्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवलं.

**हवामान**

मध्य आणि वायव्य भारतासह देशाच्या अनेक भागांत पसरलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेमुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. दिवस आणि रात्र या दोन्ही वेळी तापमान असामान्यरीत्या उच्च पातळीवर कायम असल्यानं लोकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पुढील दोन ते तीन दिवस तीव्र उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे; वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सर्वतोपरी खबरदारी घेण्याचे आवाहन केलं आहे. शरीरातील पाण्याचं प्रमाण कायम राखण्याचा आणि घराबाहेर पडताना सोबत पाणी बाळगण्याचा सल्ला त्यांनी काल दिला. घरातील ज्येष्ठ नागरिकांची नियमितपणे विचारपूस करावी, तसंच त्यांना पुरेसं पाणी पिण्याची, आठवण करून द्यावी,तसच परिसरातील पशुपक्ष्यांच्यासाठी पाणी उपलब्ध करून त्यांची काळजी घेण्याच आवाहन त्यांनी लोकांना केलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार